www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2009**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are not permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,

डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात **[ ]** प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.


© UCLES 2009

www.PapaCambridge.com

## विभाग -1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक लोकसंख्येच्या ताज्या अहवालात वाढते शहरीकरण आणि लोक, त्यांचे भवितव्य यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सन २००८ मध्ये जगातिल निम्म्याहून अधिक लोकसंख्या शहरामध्ये राहात असेल. आकड्यांच्या भाषेत सांगायचे तर ३.३ अब्ज जनता शहरात राहणारी असेल. हेच प्रमाण २०३० सालापर्यंत पाच अब्जाहून अधिक होणार आहे. वाढत्या शहरीकरणाच्या वेगात आफ्रिका व आशिया खंडातील शहरातील लोकसंख्या दुप्पट झालेली असेल. या खंडातील देश विकसनशील असून लोकसंख्येनेही जास्त आहेत.

शहरातील लोकसंख्या जगभरात वाढत चालली आहे. परिणामी मोठ्या महानगरांपेक्षा उपनगरे व छोट्या शहरांतील लोकसंख्या भविष्यात वाढत जाणार आहे. संबंध जगच वाढत्या शहरीकरणाला अपवाद नाही. एकीकडे शहरांची लोकसंख्या वाढत असताना ग्रामीण भागातील लोकसंख्येत घट होत जाईल. अर्थात ही घट स्थलांतरणामुळे होईल. ग्रामीण भागातील लोकसंख्या २००५ ते २०३० या काळात २९ दशलक्षांनी कमी होईल. नागरी लोकसंख्येतील बहुतांशी वाढ आफ्रिका व आशियातील विकसनशील देशांत होणार आहे. सन २००० ते २०३० या काळात आशिया खंडातील शहरी लोकसंख्या १.३६ अब्जावरून २.६४ अब्जावर पोहचणार आहे, तर आफ्रिका खंडातील लोकसंख्या २९५ दशलक्षांवरून ७४२ दशलक्षांवर जाईल. शहरात राहणाऱ्या एकूण जागतिक लोकसंख्येत दहापैकी सातजण हे आफ्रिका व आशिया खंडात राहणारे असतील. शहरीकरणाचा वेग आशिया खंडात सर्वाधिक आहे. इथे शहरीकरणाचा वेग ४० टक्के आहे, तर आफ्रिका खंडात हे प्रमाण ३८ टक्के आहे. पश्चिम आशियातील अरब देशांमध्ये मात्र शहरीकरणाने फारसा वेग घेतलेला नाही.

वाढत्या शहरीकरणाचे अनेक फायदे-तोटे आहेत. ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर सकारात्मकपणे व्हायला हवे. शहरात दारिद्र्य दिसते; त्याचबरोबर आशा आणि मार्ग देखील दिसतात. लोक शहराकडे आकर्षित होतात कारण त्यांना रोजगाराची संधी तेथे उपलब्ध होते. भविष्याबद्दलच्या त्यांच्या अपेक्षा शहरात पूर्ण होऊ शकतात. त्यामुळे शहरांतून साहजिकच गर्दी वाढत जाणार आहे. शहराच्या नैसर्गिक वाढी बरोबर तिथे गरिबांची संख्याही आपोआपच वाढत असते. रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याने बेकारी, गरीबी दूर होत असते. ग्रामीण भागातील लोकांपेक्षा यांचे जीवनमान थोडे उंचावते.

पर्यावरणाचे धोकेही शहरीकरणाने वाढत आहेत. असे असले तरी शहरांतून पर्यावरणाबाबत जागरूकताही वाढत चालली आहे. गरीबांच्या वस्त्यांतील कचरा, पाणी, घाण यांचा निचरा करणे, रस्ते, घरबांधणी, मोकळी खेळांची मैदाने राखणे, ध्वनी, हवा व वातावरणातील प्रदूषणासाठी निश्चित योजना आखणे व तशा सोयीसुविधा पुरविताना शासन यंत्रणेवर ताण पडणे अटळ असते.

वाढत्या शहरीकरणाच्या लाटेला कोणीच थोपवू शकणार नाही. मात्र या प्रकियेत माणूस भरडला जाणार आहे. शहरी लोकसंख्येतील वाढ हा, या शतकातील विकासावर परिणाम करणारा एक मोठा घटक आहे. त्यासाठी आतापासूनच झपाट्याने उपाययोजना करण्याची गरज आहे.

www.PapaCambridge.com

1 **खाली दिलेले शब्द वरील उताऱ्यातील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द आहेत. ते ज्या शब्दांचे विरुद्धार्थ ते शोधून काढा व ते लिहा. त्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.**

(i) अंधार

(ii) उणे [1]

(iii) अल्पांश [1]

(iv) उदासीनता [1]

(v) संथपणे [1]

2 **पुढील वाक्यांतील शब्दक्रम बदलून अचूक वाक्यरचना लिहा.**

(i) लोक भवितव्य प्रकाश आणि त्याचे यावर टाकण्यात आला. [1]

(ii) एकीकडे लोकसंख्या शहरात खेड्यातील घटत आहे तर वाढत आहे. [1]

(iii) संधी जास्त रोजगाराची खेड्यांपेक्षा आहे शहरात. [1]

(iv) जीवनमान शहरात खेड्यापेक्षा उंचावलेले असते. [1]

(v) आहे जाणार माणूस भरडला प्रक्रियेत शहरीकरणाच्या. [1]

3 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. उताऱ्यातील वाक्ये वा शब्द उत्तरात नसावी. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**

**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**

**एकुण गुण 15+5=20**

(i) संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या अहवालात कोणती भिती व्यक्त केली ? [2]

(ii) कोणत्या खंडातील शहरांतून लोकसंख्या दुप्पट होईल व का ते स्पष्ट करा. [2]

(iii) ग्रामीण भागातून लोकसंख्या घटण्यामागे कोणती कारणे आहेत ? [3]

(iv) वाढत्या शहरीकरणाचे फायदे सांगा. [2]

(v) वाढत्या शहरीकरणामुळे पर्यावरणावर कोणता परिणाम होईल ? [3]

(vi) वाढत्या शहरीकरणाच्या लाटेला थोपवण्यासाठी कोणत्या उपाययोजना आखाव्या लागतील ? [3]

**एकुण गुण** [20]

www.PapaCambridge.com

## विभाग-2

**पुढील दुसरा गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३७ टक्के लोकसंख्या ही चीन व भारतात आहे. भारतात ३० टक्के जनता शहरातून राहते. २०३० सालापर्यंत वाढ होऊन हे प्रमाण ४०.७ टक्क्यावर जाईल, असा अंदाज आहे. कृषिप्रधान देश म्हणून भारताची असलेली ओळख आता झपाट्याने नागरीकरण होणारा देश अशी होऊ लागली आहे. भारतातील महाराष्ट्र हे राज्य लोकसंख्येच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर असून या राज्याच्या शहरांतील लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत आहे. त्यामुळे लहान-लहान शहरांचे मोठ्या शहरांमध्ये परीवर्तन झपाट्याने होत आहे. परिणामी भविष्यात ग्रामीण भागातील स्थलांतर कमी करावे लागेल. तसेच वाढत्या शहरीकरणातील लोकांच्या सुखसोयीच्या सर्व बाबींचा विचार करावा लागेल. दूरदृष्टीने नियोजन करण्याची शासनावर जबाबदारी येऊन पडली आहे. शहरीकरणाच्या या लाटेत महानगरांचाही विचार करणे महत्त्वाचे आहे.

ग्रामीण भागातील स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेसारखे उपक्रम तेथील जनतेसाठी राबवून त्यांना किमान १०० दिवस काम मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली. दुष्काळग्रस्त भागात दुष्काळी कामे करवून घेण्याचे धोरण आहे. रस्ते बांधणी, दुरूस्ती या सारख्या कामातून मजुरी मिळण्याची व्यवस्था होत असते. ग्रामीण भागातून स्थलांतर रोखण्यात थोडेफार यश येत आहे, असा सरकारचा दावा असला तरी त्यात फारसे तथ्य नाही.

भारतात पाच लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली लहान शहरे आहेत व ग्रामीण भागातील जनता येथे स्थलांतर करते. शेतीपेक्षा शहरात धाव घेऊन पोट भरण्याची वृत्ती वाढत आहे. पाच लाखापेक्षा जास्त व दहा लाखाच्या आत असलेल्या शहरातूनही मूलभूत सोयींचा त्रास सहन करावा लागतो. चांगले रस्ते नाहीत, पिण्याचे पुरेसे पाणी नाही, प्रवास व दळणवळणाच्या सोयीची साधने नाहीत. विजेचा प्रश्न, घनकचरा, व्यवस्थापनाचा प्रश्न असे अनेक प्रश्न या शहरांना भेडसावीत आहेत.

वाढत्या शहरीकरणाने केवळ लोकसंख्याच वाढते असे नाही, तर त्याचा ताण सगळ्याच सुविधांवर पडतो. पर्यावरणाचे अनेक प्रश्न निर्माण होतात. वाढती झोपड्यांची संख्या, त्यांच्यासाठी शौचालये, सांडपाण्याचा निचरा... एवढे लोक एकत्र राहणार म्हणजे कचरा करणार – तो कुठे टाकणार ? लोकांच्या रोजगाराबरोबर वाढत्या रहदारीमुळे उत्पन्न होणारे प्रदुषणही वाढणारच. गुन्हेगारी, वाईट प्रवृत्तीची माणसे अशा अनेक समस्यांची न संपणारी यादी आपसूकच वाढणार आहे. भारताचा विचार केला तर २००१ च्या जनगणनेनुसार ४०.०१ दशलक्ष जनता झोपड्यातून राहते. म्हणजे शहरी लोकसंख्येच्या १४.२ टक्के लोकसंख्या ही झोपडपट्ट्यांमधून राहते. सर्वदृष्टीने विचार करता आता छोट्या शहरातील मूलभूत सोयींकडे लक्ष पुरविल्यास मोठ्या शहराकडे व तिथून महानगराकडे येणारा जनतेचा लोंढा, बऱ्याच प्रमाणात थोपवून धरता येईल.

www.PapaCambridge.com

**4 पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वा**
**उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकुण गुण 15+5=20**

**(i)** कृषिप्रधान देश म्हणून भारताची ओळख पुसट होण्यामागे कोणती कारणे आहेत ? [2]

**(ii)** भारतातील महाराष्ट्र राज्यात वाढत्या लोकसंख्येमुळे कोणती परिस्थिती उद्‌भवली ? [3]

**(iii)** ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत ? [3]

**(iv)** लहान शहरे, मोठी शहरे व यातील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न कसा जटील होत आहे ते स्पष्ट करा. [4]

**(v)** भारताच्या २००१ सालच्या जनगणना अहवालाचा तपशील काय सांगतो ? [3]

**एकुण गुण** [20]

**5 पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांच्या उत्तरातील एकूण शब्दसंख्या 140 पर्यंत असावी.**
**उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15+5=20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे २०३० सालापर्यंत जगातील वाढती लोकसंख्या व शहरीकरणामुळे होणाऱ्या प्रभावाचे स्वरुप विशद करा. [10]

**(ii)** मॉरिशस देशालाही वाढत्या शहरीकरणाचा प्रश्न भेडसावतो आहे कां ? असल्यास शासनाने याबाबतीत कोणत्या योजना आखल्यात, याचे निवेदन करा. [5]

**एकुण गुण** [20]

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of